## राज्य नाटय स्पर्धेतील पारितोषिक विजेत्यां नाटकांचा महोत्सव

राज्य नाटय स्पर्धेच्या अंतीम फेरीत निवड झालेल्या 'अग्निशिखा', 'सहस्त्रचंद्रदर्शन', 'सावित्रीचे उपाख्यान' या तीन नाटकांचे प्रयोग अनुक्रमे १७ ते १९ सप्टेंबर २००८ रोजी सायंकाळी ८.०० वा. आपल्या यशवंत नाटयमंदिरात सादर करण्यात आले. सदर नाटयप्रयोग सभासदांसाठी आणि रसिकांसाठी विनामुल्य ठेवण्यात आले होते.

## एकांकिका स्पर्धा

गेल्या वर्षापासून नाटय परिषदेतर्फे शाखां–शाखां व नाटय परिषद घटक संस्थामध्ये राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा सुरू करण्यात आली. या वर्षीच्या एकांकिका स्पर्धेत नाटय परिषदेच्या ४८ शाखांपैकी १८ शाखांनी भाग घेतला होता. एकांकिका स्पर्धेची अंतिम फेरी नाटय परिषदेच्या यशवंत नाटयमंदिर, माटुंगा, मुंबई येथे दिनांक ५ नोव्हेंबर २००८ रोजी घेण्यात आली. अंतिम फेरीसाठी निवडण्यात आलेल्या ६ एकांकिकांतून पहिल्या तीन एकांकिकांना रोख बक्षीसे देण्यात आली ती खालील प्रमाणे :–

| एकांकिकेचे नाव | शाखेचे नाव | बक्षिस रू. |
|---|---|---|
| बाप हा बापच असतो | मध्यवर्ती | ३१,०००/– |
| माझ्या प्रिय मित्रास | अहमदनगर शाखा | २१,०००/– |
| साठा उत्तराची कहाणी | पुणे उपनगर शाखा | ११,०००/– |

तसेच लेखन, दिग्दर्शन, उत्कृष्ट स्त्री आणि पुरूष कलावंत, नेपथ्य, प्रकाशयोजना यासाठीही प्रत्येकी प्रथम कमांक रू. १५००/–, व्दितीय कमांक रू. १०००/– आणि तृतिय कमांक रू. ५००/– देण्यात आले. तसेच प्रत्येक विभागासाठी उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली. पारितोषिक वितरणाचा हा सोहळा दि. ५ नोव्हेंबर २००८ रोजी रंगभूमी दिनानिमित्त सायं. ७.०० वाजता सांस्कृतिक संचालक मा.श्री. अजय अंबेकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

## यशवंत नाटयमंदिर

आपले यशवंत नाटयमंदिरास चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळत असून नाट्यगृहात होणा-या कार्यक्रमात उत्तरोत्तर वाढ होत आहे. वर्षभरात नाट्यगृहात एकूण ७७० कार्यक्रम सादर करण्यात आले. त्यात मराठी कार्यक्रम, इतर भाषिक कार्यक्रम, शुटींग, सभा इत्यादिंचा समावेश आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने अनेक नामवंत व प्रसिध्द व्यक्तींनी नाटयगृहास भेट दिली आहे.